# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./११८० /२०२२ दि. ०५ /०४/२०२२

## परिपत्रक

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिनाग/वेप/मअ २००५/१८७४/ २०२२, दि. ३०/०३/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नुसार अर्जदार / नागरिकांनी मागितलेली माहिती तसेच सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग या कार्यालयाकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (६)(३) दोन नुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत असलेले अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नुसार मागितलेली माहिती महाविद्यालयांकडून वेळेत व योग्यरित्या दिली जात नसल्यामुळे सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयास अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असल्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच संदर्भिय पत्रामध्ये नमुद संदर्भ क्र. ४ सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग या कार्यालयाचे दि. १०/१०/२०१९ रोजीच्या पत्रानुसार ज्यांनी कार्यवाही केलेली नाही, त्यांचेवर नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येईल, असेही सुचित केले आहे.

सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग या कार्यालयाचे दि. १०/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त अर्जदारांना माहिती पुरविणेकरीता महाविद्यालयामध्ये अपिलीय अधिकारी, माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी नियुक्त करण्याबाबत कळविण्यात आले असून त्याप्रमाणे नियुक्ती करुन त्यांची नावे भ्रमनध्वनीसह संबंधितांनी महाविद्यालयाचे नोटीस बोर्डवर स्पष्ट नमुद करावे तसेच नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती पुढील कार्यवाहीसाठी सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग या कार्यालयास तातडीने सादर करण्याबाबत कळविले आहे.

त्याचप्रमाणे माहितीचा अधिकारी अधिनियम-२००५ अन्वये प्राप्त प्रकरणे, निकाली काढलेली प्रकरणे, प्रलंबित प्रकरणे इत्यादी बाबतचा अहवाल दरमहा १५ तारखेचे आत तसेच वार्षिक अहवाल देखील सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग यांचे कार्यालयास न चुकता सादर करण्याबाबत कळविले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्र व त्यासोबत संलग्न विवरणपत्र यांचे अवलोकन करुन त्यानुसार तातडीने कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे

4.4.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५. सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागांचे मा. विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,

जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर

Website: dirhe.in/jdnagpur/ Email: jdhengp@rediffmail.com

Fax No. 0712 2554210 Phone No.0712 2561713


आ.क्रमांक:उशिनाग/वे.प/म.अ.२००५/९८६६/२०२२ दिनांक :-३०/०३/२०२२

**ई-मेलद्वारे**

प्रति,

१. **संचालक/प्राचार्य/वसतीगृह प्रमुख/कार्यालय प्रमुख,**
**सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतीगृहे/कार्यालये,नागपूर विभाग.**

२. **कुलसचिव,**
**रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ युनिवरसिटी, नागपूर.**

३. **सर्व प्राचार्य,**
अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शिक्षणशास्त्र तसेच,शारिरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये

**विषयः-माहितीचा अधिकार अधिनियम २००६ च्या अंमलबजावणी संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबात**

संदर्भ :-१.या कार्यालयाचे पृष्ठांकण पत्र क्र. ५३११/०५ ,दिनांक १९.११.२००५
२.या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/स्टेनो/२८७/०६ दिनांक १३ जानेवारी,२००६
३.महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२ यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०१९/(१३७/१९)मशि-४ दि.२७ मे,२०१९
४.या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/मा.अ./महा.क./५९८४/२०१९ दिनांक १०/१०/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने या कार्यालयाचे असे निर्देशनास आले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नुसार अर्जदार/नागरिकांनी मागितलेली माहिती तसेच या कार्यालयाकडुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (६)(३) दोन नुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत असलेल्या अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नुसार मागितलेली माहिती महाविद्यालयांकडुन वेळेत व योग्यरित्या दिली जात नसल्यामुळे या कार्यालयास अनेक तक्रार प्राप्त झालेल्या आहेत.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की,या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.०४ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत प्राप्त अर्जदारांना माहिती पुरविणेकरिता आपले महाविद्यालयामध्ये अपीलीय

अधिकारी,माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी नियुक्ती करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.तथापि सदर पत्रान्वये दिलेल्या सुचनेप्रमाणे महाविद्यालयात/विद्यापीठात नियुक्ती करण्यात आलेली नसल्याने या कार्यालयाचे तत्कालीन सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांचे संदर्भीय पत्र क्र. ०४ ची अवमानना केल्याची दिसून येत आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयानी संदर्भीय पत्र क्र.०४ अन्वये कार्यवाही केली नाही, त्यांचेवर नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत शासनास शिफारश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

संदर्भीय पत्र क्र.०४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आपले महाविद्यालयात अपीलीय अधिकारी,माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. सदर माहिती अधिकारी यांचे नांव भ्रमणध्वनीसह महाविद्यालयाचे नोटीस बोर्डावर देखील स्पष्ट नमुद करावे. त्याचप्रमाणे महाविद्यालयामध्ये नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास उलट टपाली (तातडीने ) या कार्यालयास सादर करण्यात यावी.

संदर्भीय शासन पत्र क्र.०३ नुसार आपणास सुचित करण्यात येते की, शासकीय अनुदानाशी निगडीत सर्व प्रकारचा अभिलेख इ. त्या-त्या शैक्षणिक संस्थातील प्राधिकृत अधिका-याकडे ठेवावा व माहिती अधिकार-२००५ अंतर्गत अर्ज आल्यास जन माहिती अधिका-यामार्फत माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार माहिती देण्यात यावी. माहिती विहित कालावधीत संबंधित अर्जदारास व या कार्यालयास न पुरविल्यास नियमानूसार जबाबदार असणा-या अधिका-यांवर कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना सुचित करण्यात येत की, सदर सुचनेची प्रत आपल्या स्तरावरुन आपले संस्था अध्यक्ष/सचिव यांना पुरवावी व अवगत करुन दयावे, ती जबाबदारी आपली राहील.

**माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ अन्वये प्राप्त प्रकरणे, निकाली काढलेली प्रकरणे, प्रलंबित प्रकरणे इत्यादी बाबतचा अहवाल दरमहा १० तारखेचे आत त्याचप्रमाणे वार्षिक अहवाल देखील या कार्यालयास न चुकता सादर करण्यात यावा.**

**(डॉ.संजय ठाकरे)**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रत : १.मा. अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहीतीस्तव सविनय सादर

२.मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, महा. राज्य पुणे -१ यांा माहीतीस्तव सविनय सादर

(पत्र क्र. मुमाआ-२०१५/वार्षिक अहवाल/प्र.क्र.१३०/०२, दि.१३/१२/२०१५ चे सहपत्र)

## विवरणपत्र क्रमांक १

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या अंमलबजावणीकरीता महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२१ मध्ये पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहायक जन माहिती अधिकारी, व अपिलीय अधिकारी यांची मंत्रालय विभागनिहाय तसेच महाराष्ट्र राज्य माहिती आयोग व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाची माहिती.

संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे नांव :-

| अ.क्र. | संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे | सहायक जन माहिती अधिकारी (एकुण संख्या) | जन माहिती अधिकारी (एकुण संख्या) | प्रथम अपिलीय अधिकारी (एकुण संख्या) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| एकूण | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २

जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीत महाराष्ट्र राज्यामध्ये प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचा एकत्रित गोषवारा

संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे

| अ.क्र. | संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/ महाविद्यालयचे नांव | डिसेंबर २०२० अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची सुधारीत संख्या | २०२१ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.(३+४) | २०२१ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जापैकी (रकाना ६ ची फोड | | २०२१ या वर्षी अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र.५-६) | २०२१ या वर्षी उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) | दारिद्र रेषेखालील लाभ घेतलेल्या नागरिकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात अर्जाची संख्या (रकाना क्र. ६-७) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

### विवरणपत्र क्रमांक २ अ

जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीत खुद्द मंत्रालयीन विभागात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

**सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.**

| अ.क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१५ अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची सुधारीत संख्या | २०१६ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.(३+४) | २०१६ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जापैकी (रकाना ६ ची फोड | | २०१६ या वर्षी अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र.५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात अर्जाची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| एकूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | | |

### विवरणपत्र क्रमांक २ ब

जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत संचालनालय/आयुक्तालय तसेच विभागीय स्तरावरील कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

**सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.**

| अ.क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१५ अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची सुधारीत संख्या | २०१६ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.(३+४) | २०१६ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जापैकी (रकाना ६ ची फोड | | २०१६ या वर्षी अखेरीस प्रलंबीत माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र.५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात अर्जाची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| एकूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | --- | --- |

## विवरणपत्र क्रमांक ३

**जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीत** महाराष्ट्र राज्यामध्ये **प्राप्त झालेल्या प्रथम अपिलांचा एकत्रित गोषवारा**

**संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे**

| अ.क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०२० अखेरीस प्रलंबीत प्रथम अपिलांची संख्या | २०२१ या वर्षी प्राप्त झालेल्या प्रथम अपिलांची संख्या | एकूण प्रथम अपिल (रकाना क्र.(३+४) | २०२१ या वर्षी निकाली काढलेल्या प्रथम अपिल अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अपिलापैकी प्रथम अपिलापैकी (रकाना क्र.५-६ ) | | **अहवालाच्या कालावधीच्या अखेरीस प्रलंबित प्रथम अपिलांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करून देण्यात आलेल्या अपिलांची संख्या | **नाकारण्यात आलेल्या अपिलांची संख्या (र.क्र.६-७)** | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## विवरणपत्र क्रमांक ३ अ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) नुसार आयोगाने सुनावणी अंती पारित केलेल्या शास्तीच्या कारवाईबाबतच्या प्रकरणांची यादी**

**संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे**

| अ.क्र. | विभागाचे नाव | अपिलकर्ता/तक्रारदार यांचे नांव | अपील/तक्रार क्रमांक व आदेशाचा दिनांक | कलम २०(२) नुसार आयोगाने दिलेल्या शिस्तीबाबत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्तीची रक्कम | **शास्तीची रक्कत वसूल केली/नाही केली** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक ३ ब

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) नुसार आयोगाने सुनावणी अंती पारित केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबतच्या प्रकरणांची यादी :

संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे

| अ.क्र. | विभागाचे नाव | अपिलकर्ता/तक्रारदार यांचे नांव | अपील/तक्रार क्रमांक व आदेशाचा दिनांक | कलम २०(२) नुसार आयोगाने दिलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईचे अनुपालन केले/नाही केले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | -- |

## विवरणपत्र क्रमांक ३ क

संस्थेचे/ विभागाचे/विद्यापीठाचे/महाविद्यालयचे

| अ.क्र. | माहिती मागविणाऱ्या अर्जदारांची संख्या | जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत माहिती दिलेल्या प्रकरणाची संख्या | जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्या आती माहिती न दिलेल्या प्रकरणाची संख्या (रकाना क्र. २-३) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |